# श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली

## राज्यशास्त्र विभाग

### वार्षिक अहवाल

### २०२३ – २४

---

**आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन साजरा :**

तहसिल कार्यालय चिखली व श्री शिवाजी महाविद्यालय राज्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ सप्टेंबर २०२३ रोजी श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली येथे आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन मा. सुरेश कव्हळे, तहसिलदार, चिखली यांचे अध्यक्षतेखाली साजरा करुण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. निकम, श्री शिवाजी शिक्षण रास्थेचे स्विकृत सदस्य प्राचार्य डॉ पी एस वायाळ, व आजीवन सदस्य मधूकरराव पाटील, प्रा. अक्षय वाकोडे, मा काळे, प्रा डॉ. गणेश मालटे व इतर सहकारी शिक्षा व महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी हजर होते. या प्रसंगी सुरेश कव्हळे, तहसिलदार, चिखली यांनी लोकशाहीचे महत्व, भारतातील निवडणूकीत लोकशाहीचे असणारे महत्व याबाबत मार्गदर्शन करुन नवयुवकांनी आपले नांव मतदार यादीत समाविष्ट करण्याबाबत आवाहन करून प्रत्यक्ष मतदानाचे वेळी आपले कुटुंबासह मतदानाचा हक्क बजावण्याबाबत देखील आवाहन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. पी.एस वायाळ यांनी लोकशाहीमुळे नागरीकांना मिळालेले स्वातंत्र्य त्याचप्रमाणे लोकशाहीत युवकांचा सहभाग याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

या प्रसंगी महाविालयीन विद्यार्थ्यांच्या स्पर्धा, निबंध स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्याथ्यांनी सहभाग घेतला.

Scanned with OKEN Scanner

## महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात पल्लवी मोतीराम साळवे हीचा सहभाग

५० व्या राष्ट्रकुल संसदीय मंडळ यांचे वतीने सांसदीय कार्यप्रणाली आणि प्रथा या विषयावरील अभ्यास वर्गात सहभाग होण्यासाठी महाविद्यालयाचा एम. ए. भाग-१ (राज्यशास्त्र) ची विद्यार्थीनी पल्लवी मोतीराम साळवे हीची निवड झाली होती. त्यामुळें तिला महाराष्ट्र राज्य विधीमंडळाचे नागपुर येथील हिवाळी अधिवेशनात ११ ते १८ डिसेंबर २०२३ या कालावधीत सहभागी होण्याची संधी मिळाली. या दरम्यान महाराष्ट्रातील विविध विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी सांसदीय कार्यप्रणाली, कामकाज पद्धत, प्रथा परंपरा व स्वरूप यांचे जवळून निरीक्षण व अध्ययन केले.

## श्री शिवाजी महाविद्यालयात मानवी हक्क दिन कार्यक्रम संपन्न.

दि. १२- १२- २०२३ स्थानिक शिवाजी विज्ञान व कला महाविदयालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने मानवी हकक दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

सदर कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.मिना निकम तर प्रमुख उपस्थितीत शिवाजी शिक्षण संस्थेचे सदस्य प्राचार्य डॉ.पी.एस वायाळ गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. पोच्छी, प्रा. डॉ. मालटे प्रा. डॉ. जुक्कलकर,प्रा. डॉ. कलाखे ह्यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अक्षय वाकोडे तर सुत्रसंचालन प्रा. डोंगरदिवे तर आभाप्रदर्शन प्रा.सोळंकी ह्यांनी केले. रोहित ढोणे व सुवर्णा बनकर ह्या विद्यार्थ्यांनी ह्यावेळी मानवी हक्क दिना निमित्त भाषण केले. कार्यक्रमासाठी प्रा.पवार, प्रा. तळेकर प्रा. उभे प्रा. मोरे यांनी परीश्रम घेतले.

Scanned with OKEN Scanner

# शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात साजरा.

दि. २५ जानेवारी २०२४ रोजी श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखलीतील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिन विविध स्पर्धाचे आयोजन करून साजरा करण्यात आला. या स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या कलागुणाचे प्रदर्शन केले. यामध्ये वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक अमर शिंदे, द्वितीय क्रमांक शेख अयान शेख राजू, तृतीय क्रमांक विशाल इंगळे, निबंध स्पर्धेत प्रथम कमांक धारा सुरशे, द्वितीय क्रमांक सुवर्णा बनकर, तृतीय क्रमांक अमृता देशमुख. तर रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक मयुरी दंदाले, द्वितीय क्रमांक मोहिनी चोपडे तर तृतीय क्रमांक वैभवी मोरगंजे या विद्यार्थ्यांनी मिळवला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मीना निकम, तर प्रमुख उपस्थितीत श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सदस्य प्राचार्य डॉ. पी.एस. वायाळ, गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रा. डॉ.पोच्छी, प्रा. डॉ. मालटे, प्रा. डॉ. जुक्कलकर, प्रा. डॉ. कलाखे, प्रा. दिलीप उन्हाळे यांची उपस्थिती होती.

प्रास्ताविक प्रा. अक्षय वाकोडे यांनी, सूत्रसंचालन प्रा. निता उभे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. मघाडे यांनी केले.

प्राचार्य डॉ. पी. एम. वायाळ यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थाना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यावेळी मतदार जागरुकता शपथ विद्यार्थ्यांना देण्यात आली. कार्यक्रमासाठी प्रा. चिचोले, पी. पी. पवार, प्रा. खरात, डॉ. सुनील पवार, प्रा. डोंगरदिवे, प्रा. संदीप उन्हाळे, प्रा. सोळंकी, प्रा. मोरे यांनी मेहनत घेतली.

Scanned with OKEN Scanner

## शिवाजी महाविद्यालयामध्ये पंढरीनाथ पाटील जयंतीनिमित्त वकृत्व स्पर्धेचे आयोजन

दि.३० सप्टेंबर २०२४ रोजी श्री शिवाजी महाविद्यालयामध्ये राज्यशास्त्र विभागाच्या वतीने वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.निकम तर प्रमुख उपस्थितीत डॉ.गणेश मालटे,डॉ.जुकलकर,डॉ.कलाखे,प्रा.उन्हाळे यांची उपस्थिती होती.सदर स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग नोंदविला.या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु.निकीता समसारे,द्वितीय क्रमांक सुवर्णा बनकर तर तृतीय क्रमांक अमर शिंदे या विद्यार्थ्यांना देण्यात आला.सदर कार्यक्रमांच्या आयोजनासाठी राज्यशास्त्र विभागाचे प्रा.अक्षय वाकोडे व प्रा.अविनाश पडघन यांनी परिश्रम घेतले.

Prof. A. S. wakode

Scanned with OKEN Scanner